**अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज) कार्यालय**
सामान्य प्रशासन, पुणे मनपा
जा.क्र. अतिमआ(ज)/साप्रवि/आस्था/६०८
दिनांक : २१/०४/२०२१

## - कार्यालय परिपत्रक -

विषय :- पुणे महानगरपालिका प्रशासनाकडील अभियांत्रिकी संवर्गातील सेवकांच्या विभागीय परीक्षेबाबत.

संदर्भ :-
१) शासन निर्णय क्रमांक पीएमसी-३०१४/प्र.क्र.२/नवि-२२, दि. २६/८/२०१४.
२) महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका, सहावी आवृत्ती, सन-१९८४.
३) शासन निर्णय क्र. संकीर्ण-२३१८/प्र.क्र.३/का.१७, दि. ०१/०३/२०१८.
४) कार्यालय परिपत्रक जा. क्र. मआ/साप्रवि/आस्था/३४४१, दि. ०६/०७/२०१८
५) कार्यालयीन आदेश जा. क्र. मआ/साप्रवि/आस्था/७३६९, दि.१२/११/२०१८
६) महापालिका आयुक्त ठ. क्र. १/०६, दि.०६/०४/२०२१

पुणे महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण), नियम २०१४ ला शासन निर्णय क्रमांक पीएमसी-३०१४/प्र.क्र.२/नवि-२२, दि. २६/८/२०१४ अन्वये मान्यता प्राप्त झाली असून महाराष्ट्र शासन राजपत्र भाग चार ब, गुरुवार ते बुधवार, सप्टेंबर ४-१०, २०१४ अन्वये प्रसिध्द करण्यात आला आहे. त्यामधील तरतुदीनुसार पुणे महानगरपालिका सेवेतील पदावर नेमणूक करण्यात आलेल्या किंवा त्यासाठी निवडण्यात आलेल्या उमेदवारांनी विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे अथवा अशी परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळविणे आवश्यक असेल, असे पुणे महानगरपालिका कर्मचाऱ्यासाठी विभागीय परीक्षा नियम २०१४ मध्ये नमूद आहे.

पुणे महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम २०१४ मधील परिशिष्ट ३, मधील नियम ४(ब) पुणे महानगरपालिका सेवाभरती नियम, २०१४ नुसार नियुक्त कर्मचाऱ्यांनी त्यांची नियुक्ती झाल्याच्या दिनांकापासून ४ वर्षात ३ संधीमध्ये विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

त्यानुसार पुणे महानगरपालिका प्रशासनाकडील अभियांत्रिकी संवर्गातील सेवकांच्या विभागीय परीक्षा देणेबाबत कार्यालयीन परिपत्रक संदर्भ क्र. ४ व ५ अन्वये प्रसृत करण्यात आले आहे.

पुणे महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम २०१४ पूर्वी नियुक्त असलेल्या अभियांत्रिकी सेवकांना महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी, नाशिक यांचेमार्फत घेण्यात येणारी परिक्षा देणेची अट नव्हती. त्यानुसार पुणे महानगरपालिका कर्मचाऱ्यांसाठी विभागीय परीक्षा नियम २०१४ मधील विभागीय परीक्षा उत्तीर्ण करण्याची अट आता लागू करणे उचित ठरणार नाही.

पुणे महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम २०१४ मधील परिशिष्ट ३, मधील नियम १२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार, पुणे महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम २०१४ अस्तित्वात येण्यापूर्वी अभियांत्रिकी संवर्गात नियुक्त झालेल्या सेवकांना

मा.महापालिका आयुक्त यांचे संदर्भ क्र. ६ चे मान्यतेनुसार परिशिष्ट ३ अ येथील अभियांत्रिकी अधिकारी महाविद्यालय, नाशिक यांचेमार्फत घेण्यात येणारी विभागीय परीक्षेतून सूट देण्यात येत आहे.

पुणे महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम २०१४ नंतर अभियांत्रिकी स्थापत्य / विद्युत / यांत्रिकी - कनिष्ठ अभियंता नामनिर्देशन (७५%) व पदोन्नती (२५%) तसेच, उप अभियंता नामनिर्देशन (२५%) या संवर्गात नियुक्त झालेल्या सेवकांनी, संदर्भ क्र. ४ व ५ चे कार्यालयीन परिपत्रकानुसार विभागीय परीक्षेबाबत महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी, नाशिक यांचेमार्फत घेण्यात येणाऱ्या परिक्षेसाठी प्रबोधिनीच्या www.metanasik.org या संकेत स्थळावरून परिक्षेबाबतची सविस्तर माहिती घेऊन, मा. संबंधित खातेप्रमुख यांचे शिफारशीने संबधित अधिकारी /कर्मचारी यांनी त्यांचे पदास आवश्यक विभागीय परीक्षेस प्रवेश घेण्याची प्रक्रिया स्वत: पूर्ण करावी व परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर गुणपत्रिका व प्रमाणपत्र यांची प्रत इकडील कार्यालयाकडे सादर करावी.

Rubal 28/4/21

(रुबल अग्रवाल)
अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)
पुणे महानगरपालिका

प्रत – १. सर्व संबंधित सेवक
२. खातेप्रमुख,
पुणे महानगरपालिका.

यांजकडे माहितीसाठी रवाना....